बुधवार, दि २५ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २ रा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# कामगारांकडुन पैशांची लूट; दलालांचा सुळसुळाट

## तक्रारी-उपोषणानंतरही प्रशासनाला जाग येईना?

**दीपक शेळके**

**जालना -** शासनाच्या महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून कामगारांसाठी विविध प्रकारच्या लाभ देणाऱ्या योजना राबविण्यात येत आहे. मात्र, या योजनेची अंमलबजावणी होत असतांना कामगारांकडुन पैशांची लूट होत असून संबंधीत कार्यालयांमध्ये- कार्यालयाबाहेर दलालांचा सुळसुळाट झाला आहे. एक हजार रुपयांपासून ते १५०० - २००० रुपयांपर्यंतची मागणी कामगारांकडे करण्यात येत असून ज्ञान नसलेले व कार्यालयाच्या फेऱ्यांना कंटाळून काम गारांना नाईलाजास्तव मागणी केलेली रक्कम देण्याशिवाय गत्यंतर राहिले नसल्याचे दिसून येत आहे. दिवसेंदिवस या संदर्भात कामगार कल्याण मंडळाकडे अनेक तक्रारी होत आहे. शिवाय उपोषणेही करण्यात येत आहे. मात्र, याचे कोणतेही सोयरसुतक प्रशासनाला नसून कामगारांच्या लाभातून डल्ला मारणाऱ्या दलालांवर कारवाईसाठी प्रशासनाला अद्यापही जाग येत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे दलाल आणि अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याचाही आरोप होतो आहे.

कामगारांच्या कल्याणासाठी शासन विविध योजना राबवत असून या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नसल्याने कामगार कल्याण मंडळाच्या अधिकाऱ्यांविरोधात कायम तक्रारीचा पाढा वाचला जात आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांचा विचार करता कामगार कल्याण मंडळाच्या कार्यालयात विविध संघटनांची आंदोलने झाली. या कार्यालयात ठिय्याही करण्यात आला. नुकतेच सोमवार (दि २३) रोजी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी कार्यालयात भेट देऊन कामगारांवर होणाऱ्या अन्यायाबाबत जाब विचारण्याचा प्रयत्न केला.

माजी आ. दानवे यांच्यासह शेकडो कामगार या ठिकाणी उपस्थित होते. या शिवाय सोमवार (दि २३) पासूनच बांधकाम कामगारांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष अर्जुन कनसे, भारतीय जनता पक्ष कामगार आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर राठोड हे आमरण उपोषणाला बसलेले आहेत. या उपोषणाकडे अद्यापही कोणताही अधिकारी फिरकला नसल्याने बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी असलेल्या मंडळाचे अधिकारी हे दलाल व स्वतःच्या कल्याणासाठीच कार्य करताहेत की काय अशी शंका उपस्थित होते आहे.

उपोषकर्ते अर्जुन कनसे व ज्ञानेश्वर राठोड यांनी बांधकाम विभागाच्या अनागोंदी कारभारावर बोट ठेवत एजंट व अधिकारी यांच्यामधील संभाषणाचे कॉल रेकार्ड तपासून त्यांचे भ्रष्टाचार उघड करण्याचे आवाहन प्रशासनाला केले आहे.



सुटी असतांना जालना शहरात एजंटांमार्फत कॅम्प होत आहेत. सुटीच्या दिवशी कॅम्प देणाऱ्या अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्या चौकशीचीही मागणी उपोषकर्त्यांनी केली आहे. जालना बांधकाम कामगार कार्यालयातील संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याची मागणी करतांनाच कामगारांची नाव नोंदणी, अपडेट, रिनिव्हलसाठी एका स्वतंत्र कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्यानंतरही अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्यामुळे मुख्यमंत्री यांनी जिल्हास्तरीय कमिटीची नेमणुक करावी अशी मागणीही उपोषकर्त्यांनी केली आहे.

बांधकाम कामगार मंडळाच्या अधिकाऱ्यांवर दिवसेंदिवस विविध आरोप होत असतांना जिल्हा प्रशासन गप्प का? असा प्रश्न उपस्थित होत असून या सर्व प्रकाराची योग्य ती चौकशी होणे गरजेचे आहे. शासनाच्या विविध योजनेचा लाभ कामगार लाभार्थ्यांना पैसे खर्च न करता मिळाल्यास शासनाच्या योजना अन् धोरणांचे फलीत होईल.

### युवा आदर्श
### मान सन्मान ...

उपोषणाची सांगता
सुटते अडकली मान
शिष्टाई आली फळा
पुन्हा उंचावली मान
संकटमोचक आनंदी
ठेंगणे झाले अस्मान
उपोषणकर्ता बाजूला
माझाचं सुरू सन्मान
नेते मंडळी स्वागतास
सजल्या सर्वत्र कमान
अमूक नाहीत फोटोत
रंगे नाटक मानापमान
उपोषणकर्ता थकला
हळूहळू करे जलपान
इकडे बाटल्या फुटल्या
चालवले सोमरस पान
आश्वासन पूर्तता वेळी
मागण्यांचे ठेवून भान
लक्ष हवे रे काट्याकडे
घातक फुकाअभिमान
सर्वसामान्य कार्यकर्ते
वाटती कस्पटा समान
बदलत्या वातावरणात
कोसळू शकते विमान
बदलत राहते ऋतूचक्र
सारखे नसते दिनमान
गांभिर्य जाणा स्थितीचे
नसते सत्ते आयुष्यमान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# उर्दू शाळेत गटारीचे पाणी; मुख्याध्यापकाची शहर महापालिका आयुक्तांकडे धाव

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील गांधीनगर येथील सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा. शा. गांधीनगर मध्ये शाळेच्या ग्राउंड मध्ये परिसरातील मागील दोन ते तीन महिन्यापासुन शाळेसमोर असलेली गटारीची पाईप लाईन पुर्णपणे चोकअप झाल्यामुळे सांडपाणी शाळेच्या आवारात शिरलेले आहे. त्यामुळे शाळेच्या ग्राउंड मध्ये सांडपाणी जमा झाले आहे. दुर्गंधी पसरलेली आहे. याविषयी स्वच्छता निरीक्षकास वारंवार लक्ष देण्यासंदर्भात सांगितले आहे. मात्र, त्यांनी अद्यापही समस्येकडे लक्ष दिले नाही. परिणामी शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यासंदर्भात शाळेचे मुख्यध्यापक यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, मागील कित्येक दिवसापासून यासंदर्भात महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक यांना या परिसरात स्वच्छता राबवावी यासंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार केला. आहे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे या प्रकाराकडे आपण स्वतः लक्ष देऊन शाळेचा परिसर स्वच्छ करावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनावर शाळेचे अध्यक्ष एकबाल कुरेशी, मुख्याध्यापक नसीर अहमद अन्सारी, मोहम्मद युनूस, शेख महमूद आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# स्वयंरोजगार उभारुन स्वावलंबी बना! - के. डी. दांडगे

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या वतीने व शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या सहकार्याने जालना येथे आज दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी एक दिवशीय उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली.यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, उद्योजक श्री.संतोष रासवे, संचालक जालना रिरोलींग मिल व शेख शरीफ



डोणगाव यांचे मार्गदर्शन लाभले. या वेळी प्रशिक्षणार्थीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की व्यक्तीने स्वबळावर स्वयंरोजगार उभारुन स्वावलंबी झाले पाहिजे त्यासाठी गरज आहे योग्य मार्गदर्शनाची त्यासाठी या प्रशिक्षणात बारकावे समजून सांगितले.या प्रशिक्षणात सौर ऊर्जा , विद्युत वाहणे,सायबर सुरक्षा, बंदीस्त शेळीपालन, कुकूटपालन, दुध व्यवसाय, जैविक खते, रेशीम उद्योग, दालमिल, विटा तयार करणे, मसाला उद्योग, गृह उद्योग, कांडी कोळसा,शेती पूरक व्यवसाय या सोबत उद्योग संधी म ार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, **पान २ वर**

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेला अर्ज करण्यास मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शनिवार दि.१८ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा केंद्रावरुन किंवा इतर ठिकाणावरुन ऑनलाईन अर्ज दि.७ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सादर करण्यास आता मुदतवाढ मिळाली आहे. तरी जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज वेळेत सादर करावेत, असे आवाहन अंबा-परतूर जवाहर नवोदय **पान २ वर**

# संपादकीय

## घोषणा विसरणारे मुख्यमंत्री!

संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी गेल्या तीन वर्षांपासून अथक प्रयत्न या समाजामार्फत केले जात आहे.यासाठी २८जून २०२४रोजी आझाद मैदान येथे एकदिवशीय धरणे आंदोलन संत कक्कय्या समाजाच्या वतीने करण्यात आले.त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजाच्या शिष्टमंडळास ढोर समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास मंडळ दिले जाईल असा शब्द दिला. त्यानंतर १२ जुलै रोजी पावसाळी अधिवेशनाचा शेवट करताना खुद्द मुख्यमंत्र्यांनी वीर शैव कक्कय्या कल्याण मंडळाने महामंडळसाठी मागणी केली आहे ती आम्ही पूर्ण करतोय अशी घोषणा विधानसभेत केली असताना त्यांना याचा विसर पडलेला दिसतोय.कारण या दोन महिन्यात त्यांनी अनेक समाजाला महामंडळ देऊ केले पण कक्कय्या समाजाला महामंडळ बाबत दिलेला शब्द मात्र विसरलेले आहेत. संत कक्कय्या समाजाने शांत आणि संयमी पणाने केलेले आंदोलनाला त्यांनी हलक्यात घेतले असावे अथवा या समाजाशी त्यांचे काही देणे घेणे नसावे असे दिसते.कदाचित मुख्यमंत्री हेही विसरले असतील की त्याच कक्कय्या (ढोर ) समाजाचे आमदार आणि नगरसेवक आपल्याच पक्षाचे आहेत. त्यांनाही त्यांनी गृहीत धरले नसावे किंवा त्यांच्या शब्दाला किंमत नसावी.मुख्यमंत्री साहेब हा विसरभोळेपणा सोडा आणि आचारसहिता लागू होण्याआधी संत कक्कय्या समाजाला महामंडळ मिळवून दया.



**दत्ता श्रावण खंदारे, ९६९९३१३६२१**

नालंदा बौद्धजन सेवा संघातर्फे नालंदा बुद्ध विहार येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे आयोजन

# धम्म उपासक आणि उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - संतोष कासारे

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव व विभाग शाखा क्रमांक अकरा आणि नालंदा बौद्धजन सेवा संघ, पंचशील महिला मंडळ, भीमगर्जना मित्रमंडळ पेण तर्फे तळे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी नालंदा बुद्ध विहार पेण तर्फे तळे येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ११ चे विद्यमान अध्यक्ष मा. संतोष बाबाजी कासारे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

सकाळी ११ : 00 वाजता धम्म ध्वजारोहण मा. अशोक राया कासारे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. ११ ते ११ : १५ धम्म पूजापाठ श्रामणेर गोविंद तांबे आणि अनिश येलवे ११: ४५ प्रमुख मान्यवर आणि प्रमुख पाहुणे यांचा स्वागत सत्कार सोहळा १२:१५ उपोसथ पालन या विषयावर प्रवचनकार अरविंद जी मोरे यांचे धम्म प्रबोधन १ : ३0 वाजता स्नेह भोजन

सदर वर्षावास धम्म प्रवचन कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान अध्यक्ष मा. रविंद्र मोरे, उपाध्यक्ष मा. नामदेव राव, चिटणीस मा. आर डी साळवी, दुय्यम चिटणीस मा. रणजित मोहिते, कोषाध्यक्ष मा. सुरेंद्र जाधव, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधिज्ञ मा. एडव्होकेट नरेश जाधव, प्रसिद्ध प्रमुख पत्रकार मा. उत्तम तांबे इत्यादी मान्यवर आणि प्रमुख पाहुणे म्हणून मा. अशोक गायकवाड माजी समाज कल्याण सभापती, योगेश शिर्के ग्रामपंचायत सदस्य खरवली, पत्रकार विश्वास गायकवाड प्रसिद्धी प्रमुख, रमेश घोगरे सामाजिक कार्यकर्ते आमडोशी, प्रवीण बागवे सामाजिक कार्यकर्ते जुने माणगाव, विनोद मोरे चिटणीस शाखा क्रमांक १, महादेव पवार अध्यक्ष दहिवली भावकी, रोहिदास मोरे सेक्रेटरी डोंगरोळी भावकी, बंडू मोरे दुय्यम उपाध्यक्ष शाखा क्रमांक ८, रामदास मोरे तालुका अध्यक्ष बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा, एडव्होकेट राकेश मोरे कोषाध्यक्ष शाखा



क्रमांक ४, संदेश साळवी अध्यक्ष शाखा क्रमांक ८, चंद्रकांत येलवे सामाजिक कार्यकर्ते माणगाव, प्रभाकर मसुरे सर सामाजिक कार्यकर्ते माणगाव, गौतम मनवर केंद्र प्रमुख बोरघर हवेली, विक्रम वाठोरे उद्योजक माणगाव, जितेंद्र साळवी सामाजिक कार्यकर्ते महादपोली, सखाराम गायकवाड सामाजिक कार्यकर्ते बोरघर, प्रोफेसर संजय खोब्रागडे डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे, संतोष मोरे मा. कोषाध्यक्ष बौद्धजन पंचायत समिती माणगाव, दिपक मोरे सामाजिक कार्यकर्ते नाणोरे, सिद्धार्थ मोरे सामाजिक कार्यकर्ते साई, सुभाष खैरे पोलीस पाटील वावे, गंगाधर जाधव चिटणीस शाखा क्रमांक ८, बाजीराव गायकवाड सामाजिक कार्यकर्ते पोटणेर, भाऊ ओव्हाल उप चिटणीस शाखा क्रमांक ८, सुरेश मोरे सामाजिक कार्यकर्ते जुने माणगाव, प्राध्यापक प्रकाश वाघमारे एस एस निकम माणगाव, संजय गायकवाड मा. सरपंच डोंगरोळी, चंद्रकांत खैरे अध्यक्ष वावे मुंबई भावकी, एकनाथ गायकवाड अध्यक्ष बोरघर मुंबई भावकी, प्रदीप हाटे सामाजिक कार्यकर्ते जुने माणगाव, प्रकाश ओव्हाल मा. अध्यक्ष शाखा क्रमांक ८, निलेश साळवी अध्यक्ष मोर्बा भावकी, प्रकाश कासे संचालक संबोधी विहार समिती, प्रशांत मोरे मा. कोषाध्यक्ष शाखा क्रमांक ८, इत्यादी मान्यवर, प्रमुख पाहुणे, धम्म उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप रा. कासारे आणि राजेश अ. कासारे करणार आहेत. तर आभार प्रदर्शन सुशील अ. कासारे हे करतील असे आयोजकांनी प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.






## पान १ वरुन

### स्वयंरोजगार उभारुन ...

संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली, विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी ,मनुष्यबळ, विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### जवाहर नवोदय ...

विद्यालयाचे प्राचार्य एस.जी. पवार यांनी केले आहे. जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी-२०२५ साठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी पाचवीच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणपत्र भरुन घ्यावे, तसेच प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी व पालकांची स्वाक्षरी करुन हे प्रमाणपत्र मुख्याध्यापकाद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करणे, जाहिरात, माहितीपत्रक, प्रमाणपत्र आदि्.परींवरूर.सीें.ळप संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करण्यासाठी प्रमाणपत्र, छायाचित्र, स्वाक्षरी १० ते १०० केबीमध्ये स्कॅन करुन भरावेत. विद्यार्थ्यांचा जन्म दि.१ मे २०१३ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीमधील असावा. जालना जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या व इयत्ता पाचवी वर्गात वर्ष २०२४-२५ मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करता येणार आहे. असे प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अंबा-परतूर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी वाटूर फाटा महामार्गावर रास्ता रोको

**परतुर । प्रतिनिधी -** धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील आंदोलन कर्ते आंदोलन करत आहेत .यांना पाठिंबा म्हणून दिनांक २३/९/२४, वार सोमवार रोजी सकल धनगर जमातीच्या वतीने परभणी जालना महामार्गावरती वाटूर फाटा येथे तीव्र स्वरूपामध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले . पंढरपूर येथे उपोषणकर्ते यांचा उपोषणाचा आज चौदावा दिवस होता.

धनगर समाजाची अनेक वर्षापासूनची मागणी आहे या मागणीचे एक निवेदन मुख्यमंत्री यांना देण्यात आले. देशात कोठेही धनगर जमात अस्तित्वात नाही धनगर यांचा हिंदी उच्चार किंवा लिखाण धनगड असा आहे .धनगर समाज त्यांच्या या संविधानिक हक्कापासून गेली ६८ वर्षापासून वंचित राहिलेला आहे त्यामुळे महाराष्ट्रातील धनगर ही जमात एसटी प्रवर्गात सामावून घेण्यास कोणतीच हरकत असणार नाही. या मागणीसाठी महाराष्ट्रातील पंढरपूर ,लातूर ,नेवासा या ठिकाणी आमरण उपोषण सुरू आहे .आणि या उपोषणाला पाठिंबा म्हणून . जिल्ह्यामध्ये बऱ्याच ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. राज्य शासनाने तात्काळ शासन निर्णय काढून धनगर सम ाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे .ही धनगर जमातीची मागणी आहे. उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळली असून, शासनाने ता त्काळ प्रश्न मार्गी लावावा या मागणीसाठी परभणी जालना वाटूर फाटा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यायात आला या

आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. जवळपास दोन तास चाललेल्या रस्ता रोकोमुळे पाच किलोमीटर चक्काजाम झाले होते. यावेळी धनगर जमातीच्या वतीने शासनाचा निषेध करण्यात आला. धनगर एसटी आरक्षणाचे प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे. तसेच सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात यावी. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा सकल धनगर जमातीच्या वतीने देण्यात आला. सकल धनगर जमातीच्या वतीने सहायक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे. व तलाठी कुलकर्णी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावरील सह्या. हनुमान दौंडे, शिवाजी तरवटे, रंगनाथ येवले,दत्ता कोल्हे, प्रताप कुरधने, बाबुराव गोसावी, सचिन बोंबले, भगवानराव पाटोळे, बानगावडे, नाना डोने, इंद्रजीत घनवट, राधाकिसन माने, दत्ता कुरधने, आदी.



# राज्यस्तरीय युवा समाजरत्न पुरस्काराने हर्षल फदाट सन्मानित



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्य करून जनसेवेसाठी सदैव तत्पर असणारे बोरगाव बु येथील युवा तरुण ,हर्षल म ोतीराम फदाट यांना माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने सण २०२४ मधील राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांना युवा समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सदर पुरस्कार हा माणुसकी म ल्टीपर्पज फाऊंडेशन या समाजसेवी संस्थेकडून दरवर्षी देण्यात येतो.या वर्षीचा सदर पुरस्कार हर्षल मोतीराम फदाट यांना प्रदान करण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना हर्षल फदाट म्हनाले की समाजसेवा करताना कुठलाही स्वार्थ न ठेवता आपल्या परीने समाजातील वंचित घटकांसाठी जेवढे करता येईल ते मी करतो.लोकांना सुखा-दुःखात व संकट प्रसंगी मदत करुन सामाजिक क्षेत्रात काम करण्यासाठी मला या पुरस्काराने एक नवीन ऊर्जा मिळाली.

मित्रपरिवाराच्या साथीने व गावाच्या पाठिंब्यामुळे मुळेच मी पुरस्काराची पायरी चढू शकलो असे म्हणत त्यांनी या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय मित्रपरिवार व बोरगाव बु गावाला दिला आहे.

त्यांना राज्यस्तरीय युवा समाज रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते दिनांक २१ सप्टेंबर रोजी मलकापूर येथे भव्य सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तराय युवा समाज रत्न पुरस्कार हर्षल मोतीराम फदाट यांना प्राप्त झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन व विशेष कौतुक केले जात आहे. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्यात सामाजिक,शैक्षणिक,विधी ,साहित्य,कला व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# इंडियन आयकॉन पुरस्काराने रोखठोक वृत्त पत्रकार यशवंत चव्हाण सन्मानित



**बेलापूर । प्रतिनिधी -** अमरदीप बालविकास फाउंडेशन व महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजातील विविध क्षेत्रातील निस्वार्थ कार्य करणाऱ्या मान्यवरांचा इंडियन आयकॉन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.प्रमुख संयोजक डॉ.शैलेंद्र पवार एन.डी.खान सलमा खान ह्यांच्या सहकार्याने महासोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.प्रमुख अतिथी नाशिक आयुक्त संगीता धायगुडे,कर्करोग शास्त्रज्ञ डॉ.अमजद खान पठाण,पावनखिंड दिग्दर्शक प्रसाद भागवत व सिने चित्रपट श्रृष्टीतील नामांकित कलाकार व जागतिक गिर्यारोहक विक्रमवीर अन्वी घाडगे हे मान्यवर सन्मान पात्र उमेदवारांचा सन्मान कारणासाठी आवर्जून उपस्थित होते.शेकडोंच्या संख्येत उपस्थित असलेल्या प्रेक्षकांच्या साक्षीने रोखठोक वृत्त पत्रकार श्री.यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर याना आतापर्यंत अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यांची निस्वार्थ रोखठोक वृत्त सेवाचा गौरव करत स्मृतिचिन्ह,पदक,शॉल व सन्मानपत्र सहित त्यांचे जाहीर कौतुक करीत इंडियन आयकॉन हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## राज्यातील २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता

**मुंबई -** राज्यात मोठे, मध्यम, लघू प्रकल्प व साठवण तलावांची कामे सुरू आहेत. सिंचनासाठी बळीराजाला म ुबलक पाणी उपलब्धततेसाठी प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. बळीराजाला सुखी, समृद्धी करण्यासाठी राज्याची सिंचन क्षमता वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण करून राज्याच्या सिंचन क्षमतेत वाढ करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. राज्यात २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याम ुळे हे प्रकल्प पूर्ण होवून बळीराजाला सिंचनासाठी आणि शहरे, गावे यांना पाणीपुरवठ्यासाठी पाण्याची चिंताही मिटेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाच्या बैठकीम ध्ये बांधकामाधीन २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील आष्टी, वाढोणा - पिंपळखुटा या नवीन उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आली. तसेच निम्न वर्धा प्रकल्पा अंतर्गत महाजनको यांच्यामार्फत ७३२ हेक्टर जलाशयाच्या पृष्ठभागाचा वापर करून तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे.

# लोकशाही दिनाचे ७ ऑक्टोबरला आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. तरी जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य), जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रक्त केंद्रासाठी ना-हरकत प्रमाणपत्र; राज्य रक्त संक्रमण परिषदेचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी -** औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा अधिनियम १९४५ म धील नियम अन्वये अशासकिय संस्था किंवा धर्मदाय संस्थेस रक्तकेंद्र स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारावर ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार राज्य रक्त संक्रमण परिषदेस आहेत. त्यानुसारच ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे, असे स्पष्टीकरण राज्य रक्त संक्रमण परिषदेने दिले आहे.

अशासकिय संस्था किंवा धर्मदाय संस्था यांच्यामार्फत विहित नमुन्यामध्ये अर्ज, त्यासोबत आवश्यक कागदपत्र सादर करण्यात येतात. या अर्जासोबत प्रक्रिया शुल्क १० हजार रूपये भरावे लागते. अशा संस्थांचे अर्ज, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत प्रस्तावांची सखोल छाननी राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व नियाम क मंडळाने वेळोवेळी दिलेल्या निर्दे शानुसार करण्यात येते व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात येते.

संस्थेचे परिपूर्ण प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा तथा अध्यक्ष तांत्रिक छाननी समितीसमोर (ढ्शलहपळलरश्र ऊेाळींशश) सर्व तपशिलासह सादर करण्यात येतात. या समितीमध्ये तज्ञ तसेच ज्या विभागातून नवीन रक्त केंद्राचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे, अशा विभागातील रक्त संक्रमण अधिकारीदेखील आमंत्रित करण्यात येतात. तांत्रिक समिती प्रस्तावित रक्तकेंद्राच्या ठिकाणी, जिल्ह्यात कार्यरत असलेले एकूण रक्तकेंद्र, सद्यस्थितीतील या रक्त केंद्रांचे रक्तसंकलन, जिल्ह्याची लोकसंख्या, रक्ताची गरज, रुग्णालये, आयपीएचएस नियमाप्रमाणे रुग्णालयात असलेल्या खाटांची संख्या या बाबींचा विचार करुन प्रस्तावीत रक्तकेंद्राची गरज आहे किंवा कसे? याबाबत शिफारशी किंवा अभिप्राय देण्यात येतो.

तांत्रिक छाननी समितीने शिफारस केलेले अथवा नाकारलेले सर्व प्रस्ताव राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळासमोर (ॠेींशीपळपस इेरीव) सादर करण्यात येतात. नियामक मंडळामध्ये १७ शासकिय पदसिध्द वरीष्ठ अधिकारी व खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य आहेत. नियामक मंडळाचे अध्यक्ष सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव व सहअध्यक्ष हे वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाचे सचिव आहेत. संचालक, आरोग्य सेवा हे सदस्य सचिव आहेत. नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये मुद्द्यावर चर्चा करुन नवीन रक्तकेंद्रांची गरज असेल, त्याठिकाणी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा विचार करण्यात येतो. त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येतो. निर्णय राज्य रक्त संक्रमण परिषद कार्यालयामार्फत संबधित संस्थेस कळविण्यात येतो. नियामक मंडळाच्या मान्यतेशिवाय एकही प्रस्ताव पारित करण्यात आलेला नाही, असेही राज्य रक्त संक्रमण परिषदेच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# ‘माझ्यामुळे’च विकास होतोय म्हणणारे कुठयं?

## रस्त्यांची बोगस अन् अर्धवट कामामुळे शहरवासिय त्रस्त!

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील विकास हा केवळ आपल्यामुळेच झाला असल्याचा दावा करणारे राजकीय नेते आता कुठयं असे विचारण्याची वेळ आली आहे. शहरात होत असलेल्या पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले आहे. यामुळे वाहनधारकांना व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांची होत असलेली बोगस अन् अर्धवट कामामुळे शहरवासिय त्रस्त होत आहे.

काही दिवसांपुर्वी बाबुराव काळे चौक ते कन्हैय्यानगरकडे जाणाऱ्या मार्गावर खड्ड्यामुळे एका युवकांचा नाहक बळी गेला होता. त्यानंतर नुतन वसाहत भागातील रस्त्याच्या मध्ये आलेल्या खांबाला धडकून एक जेल पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला होता. रस्त्यांची होत असलेली बोगस कामे यास कारणीभूत ठरली होती. असे असले तरी त्यानंतर मोठा गदारोळ झाला. विविध समाजिक संघटनांसह नागरिकांनी रस्त्याच्या बोगस कामांच्या तक्रारी केल्या. आंदोलने केली. उपोषणे केली. मात्र, याचा कोणताही परिणाम प्रशासनावर झाला नाही.





( छायाचित्र - किरण खानापुरे )

मंगळवार (दि २४) रोजी झालेल्या पावसामुळे जुना जालना भागातील टाऊन हॉल परिसरात खड्ड्यात पाणी साचल्यामुळे स्कुटी त्या खड्ड्यात पडली. सुदैवाने मोठी हानी चालकासोबत घडली नाही. दुसरीकडे चमनकडुन रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्यावर दुभाजकासाठी जागा सोडण्यात आली आहे. ही जागाही खड्ड्यासारखी झाल्याने या खड्ड्यातही अनेकदा वाहने रस्त्यावरून घसरून पडत आहेत. सरस्वती भुवन शाळे समोरील रस्त्यावरही पाणी साचल्याने शाळेतील विद्यार्थ्यांसह या भागातून जाणाऱ्या पादचाऱ्यांना याचा त्रास सहण करावा लागत आहे. उड्डाणपुलाखाली देखील रस्त्यावर पाणी साचले आहे. शहरातील मंठा चौफुली ते अंबड चौफुली दरम्यानच्या हायवे रस्त्यावरही पावसाचे पाणी दुभाजकाच्या आसपास तुंबते आहे. एकीकडे शहराचा विकास होत असल्याचे राजकीय नेते सांगताहेत हा विकास केवळ माझ्यामुळेच होतो आहे हे देखील मोठ्या तोऱ्यात सांगताहेत. पावसाळा संपत आला आता परतीच्या पाऊस वारा-वादळासह येण्याची शक्यता हवामान खात्याकडुन वर्तविण्यात येत आहे. परतीचा पावसाचे आगमन होत असतांना शहरातील महानगर पालिकेकडून कोणकोणत्या भागात पावसाळ्यापुर्वीची स्वच्छता करण्यात आली हा संशोधनाचा विषय ठरु शकतो याकडे कोण राजकारणी लक्ष देणार? वरिष्ठ पातळीवर प्रशासन काय करणार? राजकीय श्रेय वादासाठी एकाच रस्त्याचे दोन-दोनदा भुमिपूजन, लोकार्पण होत आहेत. मात्र, या कामांचा दर्जा, कामांची गती याकडे कोणत्याही राजकारण्यांना अथवा प्रशासनाला लक्ष्य द्यायला फारसा वेळ नसल्याचे दिसून येत आहे.

## शहरातील नाथनगर येथील राहत्या घरात प्रसिध्द व्यापाऱ्याने स्वतःवर गोळी झाडली



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील प्रसिद्ध व्यापारी अलकेश बागडिया यांनी स्वतवर बंदुकीची गोळी झाडल्याची खळबळजनक घटना मंगळवार (दि २४) रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. शहरातील नाथ नगर येथील राहत्या घरात स्वतःवर गोळी झाडल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले असून तेथे एका खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी अनंत कुलकर्णी, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि डीबी पथकाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अलकेश बगडीया यांनी स्वतःवर गोळी झाडुन घेतल्याबाबत अद्याप कोणतेही कारण पुढे आले नाही. दरम्यान शहरातील व्यापाऱ्यांनी स्वतः वर गोळी झाडून घेतल्यानंतर या घटनेची पोलिसांकडून आणि नातेवाईकांकडून गोपनीयता ठेवण्यात येत होती. त्यामुळे व्यापारी अलकेश बगडीया यांनी कौटुंबिक वादातून की व्यावसायिक कारणावरून स्वतःवर गोळी झाडून घेतली हे अद्यापि स्पष्ट झाले नाही. दरम्यान पोलिसांकडे अद्याप घटनेची कोणतीही नोंद नाही. उपचारादरम्या अलकेश बगडीया यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती रात्री उशिराने शहरभरात पसरली. त्यानंतर सोशल मिडीयावर अलकेश बगडीया यांना मोठ्या प्रमाणात भावपुर्ण श्रद्धांजली दिली जात आहे.

## खेळाडूंना सर्व परीने सहकार्य करू - अरविंद विद्यागर

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद नाविन्यपूर्ण योजनेतून मिळाले पाच लक्ष किमतीचे तलवारबाजी खेळाचे अद्यावत साहित्य जिल्हा क्रीडा संकुल जालना येथे जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेला आज सुरुवात झाली त्यामध्ये एकूण २०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर व जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन चे अध्यक्ष अनिल व्यवहारे यांच्या शुभहस्ते पार पडले उपाध्यक्ष सोनाजी पाटील ननवरे , आंतरराष्ट्रीय खेळाडू कुलभूषण नाईक एडवोकेट संग्राम तारडे , तलवारबाजी संघटनेचे प्रा, विजय



गाडेकर, क्रीडा अधिकारी संतोष वाबळे , क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे , अनंता झाल्टे सर , उमेश गायकवाड भरत चोरमारे रोहन वाघमारे, स्नेहा तसरे यांची उपस्थिती होती यावेळी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर व फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष अनिल व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले तसेच खेळाविषयी माहिती प्रा विजय गाडेकर यांनी दिली

### शुक्लांची हकालपट्टीची मागणी

**नागपूर-** महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची वादग्रस्त पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणुका निष्पक्ष वातावरणात होणे अशक्य आहे, त्यामुळे शुक्लांची तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

## लॉयन्स क्लबतर्फे मंदिरासमोरील गरजूंसाठी अन्नदान उपक्रम सुरू



**जालना । प्रतिनिधी -** गोरगरिबांची सेवा हीच ईश्वर सेवा या संकल्पनेतून लॉयन्स क्लब ऑफ जालनातर्फे जालना शहरातील सदर बाजार भागातील जैन मंदिर मंदिरासमोर दर महिन्याच्या चौथ्या रविवारी १५० गरजूंना अन्नदानाचा उपक्रम हाती घेण्यात आला असून, प्रकल्प प्रमुख आहेत कमलबाबु झुनझुनवाला यांच्या योगदानातून तो वर्षभर राबविण्यात येणार आहे. २२ सप्टेंबर रोजी या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी प्रकल्प प्रमुख कमलबाबू झुनझुनवाला, लॉयन्स क्लबच्या सचिव मंजु श्रीमाली, जयप्रकाश श्रीमाली यांच्यासह जैन मंदिरचे प्रकल्प प्रमुखदेखील उपस्थित होते. लॉयन्स क्लबने हा उपक्रम गरजू व्यक्तींसाठी चालू ठेवण्याचा संकल्प केला आहे. अन्न हे परब्रम्ह, अन्नदान सर्व श्रेष्ठ दान असल्यामुळे अन्नदानाची व्याप्तीही खुप मोठी आहे. अन्नाची गरज ही या भुतलावरील मानवासहीत सर्व प्राणीमात्रांना आहे. अशा उपक्रमातून मानसिक समाधान मिळते, असे कमलबाबू झुनझूनवाला म्हणाले.

## जालना शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक बिनविरोध

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिका जालना शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२४ बिनविरोध झाली आहे. मागील महिन्यात दि २७ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या पथविक्रेता निवडणूक २०२४ अधिसूचनेनुसार जाहीर झाली होती. मंगळवार (दि २४) रोजी जालना शहर पथविक्रेते निवडणूक २०२४ ही बिनविरोध पार पडली. पथविक्रेते प्रतिनिधी म्हणून शहर समितीवर आठ सदस्य निवडणूक द्वारे घ्यायचे होते. परंतु आठ सदस्यांपैकी सात जागेसाठी नामनिर्देशन पत्र



त्या त्या प्रवर्गातून प्रति प्रवर्ग असे सात दाखल झाल्यामुळे सात सदस्य हे बिनविरोध निवडून आले आहेत तर एक जागा ही रिक्त राहिली आहे. मनपा जालना सभागृहात ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. नंदा गायकवाड उपायुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या हस्ते व संस्था अध्यक्ष तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री केशव कानपुडे यांच्या उपस्थितीत निर्वाचित प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.